राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /६९७/२०१८/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| जनार्दन रामचंद्र तारु | कार्यकारी अभियंता (प्रशासन), गणेशखिंड, शहर मंडल, पुणे | अधिक्षक अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यालय, गणेशखिंड, शहर मंडल, २ रा मजला, प्रकाशभवन, सेनापतीबापट रोड, पुणे-४११ ०१६ |

<u>व्दितीय अपील सुनावणी दिनांक-१४/११/२०२२</u>

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३/१०/२०१७ | १७/११/२०१७ | १७/१२/२०१७ | १०/०१/२०१८ |

अपिलार्थी यांनी दि.१४/०२/२०१८ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे 'संपूर्ण माहिती, कागदपत्रे दिली नसल्यामुळे' असे प्रयोजन नमूद करून कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले.

आयोजित सुनावणीस अपिलार्थी तर विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

'(१)महावितरण कंपनीमध्ये स्त्री कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयात काम करण्यासाठी थांबविण्याबाबतचे परिपत्रक(२) कार्यालयीन वेळेनंतर अतिरिक्त कामाचा भत्ता महावितरण मधील कर्मचाऱ्यांना दिला जात असल्यास त्याबाबत ची माहिती(३)बायोमॅट्रिक मशिनची प्रिंट.'

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र 'ब' मध्ये 'संपूर्ण माहिती न दिल्यामुळे' असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की,

१) अपिलार्थीचा माहिती अर्ज दि. २३/१०/२०१७ रोजीचा असून तो कार्यकारी अभियंता (प्रशासन), म.रा.वि.वि.कं. मर्या. गणेशखिंड, शहर मंडल, पुणे यांचेकडे केलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१७/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली.

२) अपिलार्थीचे प्रथम अपिल दिनांक १७/१२/२०१७ रोजीचे आहे. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १०/०१/२०१८ रोजी आदेश दिला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याने प्रथम अपील निकाली काढले.

३) सुनावणीचे वेळी अपिलार्थी यानी सांगितले की, या प्रकरणामध्ये मला माहिती मिळाली आहे.तरी अपील निकाली काढावे.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१) अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. पुणे यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र. 697/2018/पुणे/2718/2023 दिनांक - 6/2/2023

प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-

अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. पुणे

यांना कळविण्यांत येते की, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनानुसार सदर प्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.